
# प्रा. गरडकर यांना पुरस्कार प्रदान

**हातकणंगले : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाचे वैज्ञानिक प्रा. डॉ. के. एम. गरडकर यांना नुकताच 'फेलो ऑफ महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' हा पुरस्कार प्राप्त झाला. संशोधन क्षेत्रात प्रतिष्ठित मानला जाणारा हा पुरस्कार आहे. महाराष्ट्र ॲकॅडमी व सायन्सेस ही संस्था प्रामुख्याने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनात अतुलनीय कामागिरी बजावलेल्या वैज्ञानिकांना हा पुरस्कार बहाल करते. प्रा. गरडकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



डॉ. गरडकर यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

प्रा. डॉ. गरडकर हे शिवाजी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांना संशोधन क्षेत्रात २५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. सध्या ते इंडस्ट्रियल केमिस्ट्री या विभागाचे प्रमुख समन्वयक म्हणून कामे पाहत आहेत. सौरऊर्जा, फोटोकॅटालायसीस, गॅस सेन्सिंग इत्यादी क्षेत्रात त्यांनी १५० हून अधिक अनेक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत व याचा संदर्भ जगभरातील जवळपास ३७२३ हून अधिक संशोधकांनी आपल्या शोधनिबंधासाठी घेतला आहे.

# विद्यापीठ उद्यानांना पुष्पप्रदर्शनात विजेतेपद

**कोल्हापूर :** कोल्हापूरचा गार्डन क्लब व राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५० व्या पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या फुलांना व उद्यानांना सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त होणे म्हणजे कोल्हापूर शहराच्या फुप्फुसाची देखभाल करणाऱ्या श्रमिकांचाच सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे व्यक्त केली. गार्डन क्लब आणि राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुवर्णमहोत्सवी पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा उद्यान विभाग ४० गटांत सहभागी झाला. त्यापैकी ३० गटांत यश मिळविले. १२ गटांत प्रथम क्रमांक, १२ गटांत द्वितिय क्रमांक आणि ६ गटांत तृतीय क्रमांक पटकावून स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. यानिमित्त उद्यान विभागाच्या सहकाऱ्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिनंदन केले.

# बी.जे., एम.जे., बी.लिब. अभ्यासक्रम रिक्त जागांसाठी १२ रोजी पुनर्प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यापीठ अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी १२ जानेवारी रोजी पुनर्प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. मानवव्यशास्त्र इमारतीमध्ये परीक्षा होणार आहे. यात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अभ्यासक्रम, बी.लिब., एम.लिब., बी.जे..एम.जे., एम.ए.मास कम्युनिकेशन, बी.एस्सी.एम.एस्सी.नॅनो सायन्स (एकत्रित), एम.एस्सी. नॅनो सायन्स, एम.एस्सी. संगणकशास्त्र, एम.एस्सी.मेडिकल इनफॉर्मेशन मॅनेजमेंट विषयांचा यात समावेश आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यासंदर्भातील अधिक माहिती उपलब्ध आहे.

# विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेश अर्जासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभागातील रशियन, फ्रेंच, जपानी, पोर्तुगीज अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्जाची मुदत १६ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी विदेशी भाषा विभागातील एक वर्ष मुदतीच्या सर्टिफिकेट कोर्स इन रशियन, फ्रेंच, पोर्तुगीज, जपानी व डिप्लोमा कोर्स इन जर्मन व जपानी भाषेसाठी ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती लिंक उपलब्ध आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# 'द अनबिटेबल'चे विद्यापीठात प्रकाशन



टेंबलाईवाडी : 'द अनबिटेबल' पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी ज्योती क्षीरसागर, विजयसिंह माने, मनीषा माने, डॉ. अजय मस्के, अश्विनी कांबळे, मनीष आपटे आदी.


टेंबलाईवाडी, ता. ३ : "अधिकाधिक उत्तम काम करण्यासाठी 'द अनबिटेबल' पुस्तक प्रवृत्त करते. विद्यार्थी, शिक्षक, पालकांनी ते आवर्जून वाचायला हवे," असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वाठार येथील डॉ. अजय मस्के, अश्विनी कांबळे यांनी लिहिलेल्या 'द अनबिटेबल : एन एनलाइटन्ड पिक परफॉर्मर' पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. तूरची-तासगाव येथील महाराष्ट्र पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुख ज्योती क्षीरसागर, विजयसिंह माने, जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'द अनबिटेबल' पुस्तकाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. त्यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे डॉ. मस्के यांच्या स्वतःच्या अनुभवांतून ते आले आहे. त्यामुळे त्याची विश्वासार्हता वाढली आहे. त्यांची प्रचिती घेता येऊ शकते.

अंगिकृत कोणतेही काम एखादा उत्तम करीतच असतो; पण ते त्याहूनही अधिक चांगले करता येऊ शकते, हे सांगून त्या दिशेने जाण्यास हे पुस्तक वाचकाला प्रवृत्त करते."

क्षीरसागर यांनी डॉ. मस्के यांनी आयुष्यात खूप सुरवातीपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम अंगिकारले, त्याची मी साक्षीदार आहे. त्या कार्याचे फलित म्हणजे हे पुस्तक असल्याचे सांगितले.' डॉ. श्रीकांत पाटील, डी. डी. शिंदे, मनीष आपटे, विक्रांत हलगली, नितीन माणगावे, साई प्रसाद, उमेश सुतार, सूरज चौगुले, अजित शिंदे, सुरज चव्हाण, ओंकार मगदूम उपस्थित होते. कौस्तुभ बारवडे यांनी स्वागत केले. कांबळे यांनी पुस्तक परिचय करून दिला. डॉ. मस्के यांनी आभार मानले.



# 'मनुष्यबळ विकासा'त नीतिमूल्यांना महत्त्व



टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठात डॉ. एच. एम. ठकार, डॉ. ताहीर झारी लिखित संदर्भग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

टेंबलाईवाडी, ता. १ : "मनुष्यबळ विकासाच्या क्षेत्रात नैतिक मूल्यांचा संकोच झाल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण होते. या संदर्भात नीतिमूल्यांचे असाधारण महत्त्व आहे," असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या एमबीए युनिटचे डॉ. एच. एम. ठकार, देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. ताहीर झारी यांनी लिहिलेल्या 'एथिकल परस्पेक्टीव्ह्ज ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "मनुष्यबळ विकास क्षेत्रात प्रामाणिकपणा, समर्पण वृत्ती, नैतिक मूल्यांच्या जोपासनेला मोठे महत्त्व आहे. त्यांचा संकोच झाल्यास मनुष्यबळावर त्याचा विपरित परिणाम होतो; पण, उद्योग-व्यवसायांवरही दुष्परिणाम होऊ लागतात. याचा देशाच्या भवितव्याशी थेट संबंध असल्याने असा संकोच होणे कोणालाच परवडणारे नाही, याची जाणीव करून देणारा उत्तम संदर्भग्रंथ आहे." प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, "हा संदर्भग्रंथ एमबीएच्या विद्यार्थ्यांसह उद्योग-व्यवसायांत कार्यरत प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे." वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, ज्येष्ठ विधिज्ञ व्ही. एन. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ठकार यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला. डॉ. झारी यांनी आभार मानले. गणित अधिविभाग प्रमुख डॉ. सरिता ठकार, डॉ. केदार मारुलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे उपस्थित होते.